|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र.कबचौउमवि/१४ /वि.वि./२७३/२०२२ दि. २६/०९/२०२२

**प्रति,**

१) मा. प्राचार्य/ संचालक, कबचौउमविशी संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्था.

२) मा. संचालक/ विभागप्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा व विभाग.

**विषय :- 'आदिवासी नायकांच्या स्वातंत्र्य लढयातील योगदान' या विषयावर संमेलनाचे आयोजन करण्याबाबत..**

महोदय,

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव कार्यक्रमा अंतर्गत राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोग, नवी दिल्ली व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने **शनिवार दिनांक ०८ ऑक्टोबर, २०२२** रोजी सकाळी **१०.०० वाजता** विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात **'आदिवासी नायकांच्या स्वातंत्र्य लढयातील योगदान'** या विषयावर विद्यार्थी संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

संमेलनाचे उद्घाटन मा. कुलगुरु प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली मा. डॉ. विजयकुमार गावीत, मंत्री, आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात येणार आहे. करीता आपणास विनंती की, आपल्या महाविद्यालयातील **अनुसूचित जमातीच्या (S.T.) फक्त ५ विद्यार्थी व ५ विद्यार्थीनींना** सदर संमेलनास पाठवावे व तसे आपल्या स्वाक्षरीचे पत्र विद्यार्थ्यांना द्यावे. सदर संमेलनास येणा-या विद्यार्थ्यांना प्रवासभत्ता (रेल्वे/ एस.टी.बस तिकीट सोबत आणावे) तसेच चहा, नास्ता व दुपारच्या भोजनाची व्यवस्था विद्यापीठामार्फत करण्यात आलेली आहे.

तसेच सदर विद्यार्थी संमेलनात पोष्टर प्रदर्शन स्पर्धा आयोजित करण्यात आली असून प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाचे बक्षिस रोख स्वरुपात प्रथम क्रमांक- ३,३७५/-, व्दितीय क्रमांकास रु. २,२७५/- व तृतीय क्रमांकास रु. १,१७५/- देण्यात येणार आहे.

आपला विश्वासू,

२६/०९/२२

(प्रा. सुनील बा. कुलकर्णी)

**संचालक, विद्यार्थी विकास**